# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ६३-२३ दिनांक :- २५/०२/२०२३

## Santhome Public School, Mira Road येथे सायबर गुन्हे शाखेकडुन शालेय विदयार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील शालेया शिक्षण घेणाऱ्या विदयार्थांमध्ये सायबर गुन्हयांचे अनुषंगाने जनजागृती व्हावी याकरीता सँथोम पब्लीक स्कुल व सायबर गुन्हे शाखेच्या संयुक्त विदयमाने दिनांक २४/०२/२०२३ रोजी सँथोम पब्लीक स्कुल, मिरारोड येथे विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

विदयार्थी संवाद मेळावामध्ये विद्यार्थी यांना दैंनदीन सोशल मिडीया वापराबाबत होणारे गुन्हे, तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत जनजागृती करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज, त्यांचे प्रश्नांचे निरसन करण्यात आले.

सदर विदयार्थी संवाद मेळावा श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त-गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, ठाकूर रामनारायण कॉलेज, दहीसर येथील सायबर गुन्हे कक्ष इंटर्न सायशा दलाल, विग्नेश भिसे यांचे उपस्थितीत पार पडला असून सदर संवाद मेळावा करीता सँथोम स्कुलचे १५ शिक्षक व आठवी, नववी, दहावी चे एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




